# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहा. आयुक्त जी/उ विभाग यांचे कार्यालय, पहिला मजला, हरिश्चंद्र येलवे मार्ग  दादर (पश्चिम) मु. ४०००२८

क्र. सअ/जीउ/2477/घकव्य/दि. 06.11.2025

विषय:- जी/उ विभागामध्ये महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त (६ डिसेंबर २०२५) जी/उ विभाग हद्दीमध्ये साफसफाई करण्यासाठी इच्छुक संस्थांकडून अर्ज मागविणेबाबत.

## स्वारस्य अभिव्यक्ती
## जाहिरात

जी/उ विभागामधील "महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या  महापरिनिर्वाण दिनानिमित्त (६ डिसेंबर २०२५)  जी/उ विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये साफसफाई करण्याकरिता, बृहंन्मुंबई महानगर पालिकेच्या क्षेत्रामधील नोंदणीकृत असलेल्या इच्छुक नोंदणीकृत सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा, सहकारी संस्था, अशासकीय संस्था, महिला बचत गट इ. संस्थेमार्फत स्वयंसेवक पुरवठा करणे व स्वच्छता राखण्याकरिता प्राप्त अर्जातून स्वारस्य अभिव्यक्तीमधील अटी व शर्ती पुर्ततासापेक्ष पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

अर्जाचा नमुना जी/उ विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. ३६३.७/- + १८%(वस्तु व सेवा कर), इसारा अनामत रक्कम रु.१,०००/- रोख रक्कम किंवा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डी.डी. (**बृहन्मुंबई महानगपालिका)** या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र **(C.F.C.)** येथे जमा केल्यानंतर अर्ज दि.०६.११.२०२५ ते दि. १३.११.२०२५ सकाळी ११.०० ते संध्याकाळी  ०४.०० (दुसरा व चौथा शनिवार तसेच सार्वजनिक सुट्टी वगळून) या वेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक जी/उ विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप सदर कामाच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी जी/उ विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क साधावा.  संस्थेने जी/उ विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारिख दि.१४.११.२०२५ दुपारी ०३.०० वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत तसेच सदर संस्थांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-

**सहा.अभि.(घकव्य)   जी/उ विभाग**